अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय, ९१
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०
दुरध्वनी क्र. २४९२१२१२, २४९२२६१८
E-mail addlcpacbmumbai@mahapolice,gov.in
दिनांक १६/१०/२०२५

**-: प्रेसनोट :-**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गु.र.क्र | ३३/२०२५ |
| कलम | कलम ७, ७(अ), १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| अटक आरोपी लोकसेवक | १) अविनाश शांताराम कांबळे, ५२ वर्षे, पद- निरीक्षक(अनुज्ञापन),<br>२) प्रदीप प्रभाकर खंडागळे, ३४ वर्षे, पद- शिपाई, नेमणूक - वरिष्ठ निरीक्षक अनुज्ञापन यांचे कार्यालय, के/पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, अंधेरी(प), मुंबई<br>३) राजू अर्जुन देठे, ४४ वर्षे, खाजगी इसम (महेली सायबर कॅफे, अंधेरी(प), मुंबई |
| लाचेची मागणी | रूपये २०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | तडजोडीअंती रुपये १५,०००/- |
| हस्तगत लाचेची रक्कम | रुपये १५,०००/- |
| थोडक्यात हकीगत | यातील फिर्यादी यांचे मालकीचे डी.एन.नगर, अंधेरी(प),मुंबई येथे दुकान असून सदरहू दुकान त्यांनी भाडेतत्वार दिलेले आहे. दिनांक ०९/१०/२०२५ रोजी के/पश्चिम विभागाचे लोकसेवक अविनाश कांबळे हे दुकानात आले व दुकानाची कागदपत्रे तपासली असता, बीएमसी ॲक्ट कलम ३१३ अन्वये परवाना नसल्याचे आढळून आले. त्यानुसार लोकसेवक यांनी दुकानातील भाडेकरू यांना सांगितले की, दिनांक १०/१०/२०२५ रोजी दुकान मालक यांना कागदपत्रे घेवून कार्यालयात भेटण्यास सांगितले. त्यानुसार दिनांक १०/१०/२०२५ रोजी फिर्यादी यांनी के/पश्चिम विभाग येथे जावून लोकसेवक कांबळे यांची भेट घेतली असता, लोकसेवक कांबळे यांनी फिर्यादी यांना बीएमसी ॲक्ट कलम ३१३ अन्वये परवाना नसल्याचे सांगून दुकान सुरू ठेवायचे असेल तर रू. २०,०००/- दयावे लागतील अथवा दुकानावर निष्कासन कारवाई करावी लागेल असे सांगून लाचेची मागणी केली. परंतु फिर्यादी यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाप्रवि कार्यालयात दिनांक १४/१०/२०२५ रोजी तक्रार अर्ज केला.<br>फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून दिनांक १५/१०/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, यातील लोकसेवक अविनाश शांताराम कांबळे यांनी फिर्यादी यांचे दुकानावर निष्कासन कारवाई न करण्याकरीता तडजोडीअंती रू. १५,०००/- लाचेची मागणी करून लाचेची रक्कम स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक अविनाश कांबळे यांनी लाचेची रक्कम लोकसेवक प्रदीप खंडागळे यांचेकडे देण्यास सांगितले. लोकसेवक खंडागळे यांना लोकसेवक कांबळे यांनी मागणी केलेली रक्कम लाचेची आहे हे माहिती असताना सुध्दा त्यास प्रोत्साहन देवून फिर्यादी यांना सदरहू लाचेची रक्कम सायबर कॅफेतील खाजगी इसम राजू देठे यांस देण्यास सांगितले. त्यानुसार खाजगी इसम राजू देठे यांना फिर्यादी यांचेकडून लाचेची रक्कम रू. १५,०००/- स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणुन उपरोक्त नमूद लोकसेवक व खाजगी इसम यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७, ७(अ), १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**तपास अधिकारी :-** **श्रीमती सुनयना सोनावणे, पोलीस निरीक्षक** **पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. कृष्णा मेखले, पोलीस निरीक्षक**

मार्गदर्शक अधिकारी- श्री. संदिप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(मनिषा झेंडे)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागितल्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- **लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**

टोलफ्री **क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८**

**व्हॉट्सअप क्र.** :- **8828241064** **मोबाईल ॲप** :- **www.acbmaharashtra.net**
**वेबसाईट** :- **acbmaharashtra.gov.in, acbwebmail@mahapolice.gov.in**
**ईमेल** :- **addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
**फेसबुक** :- **www.facebook.com - Maharashtra ACB**